# मुंबई विद्यापीठ

No. Aff./ICC/ (2018-19)/46/ of 2019

परिपत्रक:

विषय:— अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ नियम व नियमन २०११.
महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन परिपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी होणेबाबत.

संदर्भ:— अन्न सुरक्षा आयुक्तांचे क्र.असुका/१४९१/१८/७ दिनांक २७ डिसेंबर, २०१८ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, अन्न व औषध प्रशासन (म. राज्य) अन्न व सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व नियमन २०११ ची अंमलबजावणी करते. संपूर्ण महाराष्ट्रात जनतेला स्वच्छ व सुरक्षित अन्न मिळावे यासाठी हे प्रशासन नेहमी सर्तक असते. विद्यापीठ/ महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था येथे शिक्षण घेणारे विद्यार्थी हे भविष्यातील देशाचे आधारस्तंभ आहेत व त्यांना याठिकाणी Safe and Nutritious Food मिळावे म्हणून SNF@school ही पुस्तिका प्रकाशित करण्यात आली असून ती www.fssai.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

त्याअनुषंगाने संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना सुचित करण्यात येत आहे की, आपल्या महाविद्यालयाच्या आवारातील उपहारगृहाच्या तपासणी करण्याचे आदेश आपल्या अधिनस्त उपहारगृहे/ कॅन्टीन व्यवस्थापन पाहणा–या अधिका–यांना देण्यात यावेत, सदर उपहारगृहात तपासणी करावयाच्या मुद्दयांबाबत तपासणी अहवाल/ चेक लिस्ट सोबत जोडली आहे. चेक लिस्ट प्रमाणे तपासणी करून त्याचा अहवाल संबंधित विभागाच्या अथवा जिल्हाच्या, सहआयुक्त (अन्न) तथा सहायक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन कार्यालयास कळवावा.

मुंबई–४०० ०३२
१२ फेब्रुवारी, २०१९

(डॉ अजय देशमुख)
कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक.